महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३१ वा | दिनांक : १६/०२/२०२५ | वार : रविवार

## भास्कर जाधव पक्षावर नाराज नाहीत, - अंबादास दानवे यांचे स्पष्टीकरण



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे कोकणातील एकमेव आमदार भास्कर पक्षात नाराज असल्याच्या चर्चा आहेत. परंतु भास्कर जाधव पक्षावर नाराज नसल्याचे अंबादास दानवे यांनी स्पष्ट केले. भास्कर जाधव आणि पक्षप्रमुख यांचे नियमित बोलणे होत असते, असे त्यांनी सांगितले. त्यांनी एखादी प्रतिक्रिया व्यक्त केली म्हणजे ते पक्षावर नाराज आहेत, असा त्याचा अर्थ होत नाही, असेही अंबादास दानवे म्हणाले.

उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत आज शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांची बैठक पार पडली. मातोश्रीवर पार पडलेल्या बैठकीला अंबादास दानवे, विनायक राऊत यांची देखील उपस्थिती होती. यावेळी उद्धव ठाकरे यांनी विनायक राऊत, सुभाष देसाई आणि अनिल देसाईंसोबत चर्चा केली. या बैठकीनंतर अंबादास दानवे यांनी माध्यमांशी संवाद साधला. शिवसेनेच्या सर्व नेत्यांनी कशाप्रकारे सक्रिय व्हावे, यावर चर्चा करण्यासाठी संघटनात्मक बैठक होती, असे अंबादास दानवे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केले.

ठाकरे गटाला सध्या गळती लागल्याचे दिसत आहे. पक्षातील अनेक नेते भाजप आणि शिंदे गटात प्रवेश करत आहेत, याबाबत अंबादास दानवे यांना विचारले असता, मोठे मोठे प्रलोभन देऊन, कोणताही विचार नसताना लोकांना संघटनेत प्रवेश दिला जात आहे. संघटना कोणासाठी थांबत नसते. संघटना ही सतत चालणारी प्रोसेस आहे. शिवसेनेने याआधी असे अनेक अनुभव घेतलेले आहेत. या सगळ्या अनुभवातून शिवसेना तावून, सुलाखून निघाल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले.

कोकणातून एकेकाळी मुख्यमंत्री असलेले नारायण देखील पक्ष सोडून गेले होते. त्यानंतर शिवसेना कोकणात उभी राहिली. तेथून शिवसेनेचे खासदार आणि आमदार निवडून आले. सध्या कोकणातील चांगले लोक गेले, हे मान्य केले पाहिजे. परंतु, संघटना यावरही मात करेल, असा विश्वास दानवे यांनी व्यक्त केला.

कोकणातील शिवसेनेचे एकमेव आमदार भास्कर जाधव नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. माझ्या कार्यक्षमतेप्रमाणे मला संघटनेत काम मिळत नसल्याची खंत भास्कर जाधव यांनी बोलून दाखवली आहे. याबाबत पत्रकारांनी अंबादास दानवे यांना छेडले असता ते म्हणाले, भास्कर जाधव हे ज्येष्ठ नेते आहेत. मी लहान शिवसैनिक आहे. त्यामुळे मी त्यावर बोलणे योग्य ठरणार नाही. पक्षप्रमुख आणि त्यांचे नियमित बोलणे होते. त्यांनी एखादी प्रतिक्रिया व्यक्त केली म्हणजे ते पक्षावर नाराज आहेत, असा त्याचा अर्थ होत नाही. भास्कर जाधव शिवसेनेचे विधानसभेतील नेते आहेत. या जबाबदाऱ्या मोठ्याच आहेत. भास्कर जाधव आणि पक्षप्रमुख यांचे नियमित बोलणे होत असते. ते आजच्या बैठकीलाही व्हिडिओ कॉलद्वारे हजेरी लावली होती. वेळेवर बैठक ठरल्यामुळे ते मुंबईत पोहोचू शकले नाही, असे अंबादास दानवे यांनी सांगितले.

ठाकरे गट एकनाथ शिंदेंवर बोलला तर, मातोश्री आम्ही अनेक दिवस काढलेत. आम्ही बोलायला सुरुवात केली, तर अवघड होईल, असा इशारा रामदास कदम यांनी दिला होता. यावरही अंबादास दानवे यांची प्रतिक्रिया दिली. रामदास कदम यांच्याविषयी काय बोलणार? जे काही बोलायचे होते, ते बोलून टाकले आहे. आम्ही काढलेले आहे, तर तुम्हीही बोला, तुम्हाला कोणी थांबवले, असा टोला अंबादास दानवे यांनी लगावला.

एकनाथ शिंदे यांच्याकडे आमदार आहेत, मात्र संघटना नाही, अशी टीका दानवे यांनी उपमुख्यमंत्र्यांवर केली. शिवसेना प्रमुखांची जी संघटना आहे, ती उद्धव ठाकरेंकडे आहे. तुमच्याकडे खरेदी-विक्री व्यवहारातून आलेली मंडळी आहे, असे मी जबाबदारीने सांगेल, असे ते म्हणाले.

ठाकरे गटाला गळती लागलेली असताना देखील पक्षातून नेत्यांची हकालपट्टी केली जात आहे. रत्नागिरीतील तीन नेत्यांची आज पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत हकालपट्टी करण्यात आली. यावर बोलताना अंबादास दानवे म्हणाले, काही पक्षविरोधी काम करत असतील, तर पक्षाला या सगळ्याचा विचार करावा लागतो. कारण सध्याच्या घडीला पक्षाला शिस्त महत्त्वाची आहे. पक्षाची शिस्त सोडून कोणी पक्षापेक्षा मोठा नाही, हा संदेश पण द्यावा लागतो. तो दिला असेल.

## अजित पवारांची खंत - माझा भाऊच माझ्यासोबत नाही



**जालना :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझा भाऊ सोबत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. स्वतःच्या घरात काय जळतंय ते आधी बघावे, मग दुसऱ्यांच्या घराचा विचार करावा, असे मी पूर्वी रेटून बोलायचो, पण आता दबकत बोलतो. कारण आज माझा भाऊच माझ्यासोबत नाही, असे अजित पवार म्हणाले. ते आज जालन्यात बोलत होते. निवडणुकीत अजित पवार यांचे त्यांच्या भावासोबतचे ताणले गेलेले संबंध अद्यापही व्यवस्थित झाले नसल्याचे त्यांच्या विधानावरून दिसून येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर पवार कुटुंबातही मोठी फूट पडली आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीतही पवार विरुद्ध पवार अशी लढत पाहायला मिळाली. निवडणुकीचा प्रचारादरम्यान एकमेकांवर टीका देखील करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीत बारामतीमध्ये अजित पवार यांच्या विरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार उभे होते. त्यावेळी युगेंद्र पवार यांचे वडील आणि अजित पवार यांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवार हे देखील आपल्या मुलाच्या बाजूने होते. त्यांनी अजित पवारांविरोधात भूमिका घेतली होती.

स्वतःच्या घरात काय जळतेय ते पहिले बघितले पाहिजे. तरच दुसऱ्याचे घर तुम्ही शाबूत ठेवू शकता. आमच्यातले काही पुढारी असे आहेत की, त्यांच्या घरातलेच लोक त्यांच्याबरोबर नाहीत आणि बाकी त्यांना उपदेश देत बसतात. मी तर रेटून बोलायचो. पण आता दबकत दबकत बोलतोय. कारण माझा भाऊ माझ्याबरोबर नाही. ठीक आहे काम चांगले करा. ही भर आपण दुसरीकडून भरून काढू, अशा शब्दांत अजित पवार यांनी आपला भाऊ सोबत नसल्याची खंत बोलून दाखवली.

लोकसभा निवडणुकीत आपल्याला अपेक्षित असे यश मिळाले नाही. तटकरे साहेब एकटे निवडून आले म्हणून आपली काहीतरी लाज राहीली. परंतु, आपण खचलो नाही. मी नेहमी महाराष्ट्रामध्ये लोकांना सांगत असतो आणि तुम्हालाही सांगतो, यश आले म्हणून हुरळून जायचे नाही आणि अपयश आले म्हणून खचून जायचे नाही. लोकसभा निवडणुकीत माझ्या विधानसभा मतदारसंघात माझ्या पत्नीला ४८ हजार मते कमी पडली म्हणून रडत बसलो नाही. पण, नुसतेच देव-देव केला तर निवडून येणार आहे का? त्यामुळे श्रद्धाही ठेवा आणि लोकांचे प्रश्नही सोडवा, असे आवाहन अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना केले.

अजित पवार यांनी यावेळी लाडकी बहीण योजनेबाबतही मोठे वक्तव्य केले. महिलांचे प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. लाडकी बहीण योजनवरुन आमच्यावर टीका केली जात आहे. ही योजना बंद होणार असे सांगितले जात आहे. कालच मी ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या चेकवर सही केली आहे. लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता आठ दिवसांत मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही शब्दाचे पक्के आहोत. दिलेला शब्द पाळणारे आहोत. परंतु दिलेल्या योजनेचा फायदा पण तुम्ही नीट केला पाहिजे, असेही अजित पवार म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ फेब्रुवारी २०२५


## जेईएस महाविद्यालय जालना येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** जे.ई.एस. महाविद्यालयात श्री संत सेवालाल महाराजांची २८६ वी जयंती साजरी साजरी करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.महावीर सदावर्ते, उपप्राचार्य प्रा .प्रवीण बाफना, पर्यवेक्षिका प्रा. करूना वासनिक, विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य डॉ. लक्ष्मीकांत शिंदे, प्रा. बिकड, शामराव राठोड, पी.पी.पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रा.वसंत पवार, आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सेवालाल महाराजांची प्रखर आणि परिवर्तनवादी विचारसरणी ते आपल्या वर्तनातून सांगायचे प्राणीमात्रावर दया करा. निसर्गाचे संगोपन स्त्रियांचा आदर करा.कोणत्याही गोष्टीचा बुद्धीच्या कसोटीवर तपासून स्वीकार करा.तसेच स्वतः विश्वास पात्र बना.प्रगत विचारांचा मिळून मिसळून राहणारा समाज प्रगतीपथावर जाईल कोणाची निंदा करू नका.सत्याचा मार्ग स्वीकारा, सत्याच्या सोबत राहा.चोरी हिंसा करू नका.अन्यायाविरुद्ध आवाज उठवा.बुवाबाजी अंधश्रद्धेच्या मागे लागू नका.संत सेवालाल महाराज म्हणायचे "जाळंजो छाळंजो पचच मानजो" म्हणजे विज्ञानवादी निरीक्षणातून पहा.त्या गोष्टीचा अर्थ ओळखा आणि त्यानंतरच स्वीकारा.समाजासाठी अजन्म ब्रम्हचारी राहून बंजारा समाजाला अंधश्रद्धेतून व कुप्रथेतून वाचवण्यासाठी संत सेवालाल महाराजांनी वेळोवेळी प्रयत्न केल्याचे दिसून येते., असे प्रा. पवार यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी - शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंडवाडी अंगणवाडीतील मुलांना गणवेश व शालेय साहित्य वाटप




**कन्नड (अरुण थोरात):** मुंडवाडी ता. कन्नड येथील अंगणवाडीत चि. समर्थ शितल प्रज्वल मिसाळ याचा प्रथम वाढदिवसा केवळ घर परिसरात न साजरा करता या निमित्त अंगणवाडीतील चिमुकल्या मुलां मुलींना तीस गणवेश व शालेय साहित्य, मिठाई चे वाटप करुण वाढदिवस साजरा केला. या उपक्रमा मुळे मिसाळ व घनकर परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या लाडक्या बाळा प्रमाणे समाजातील मुलां मध्ये आनंद व्यक्त व्हावा व मुलांना शिक्षणाची गोडी लागावी या हेतूने साजरा करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे निश्चीत इतरांना ही प्रेरणा मिळेल अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थितांनी दिली.

याप्रसंगी सरपंच ताराबाई घनकर, रमेश घनकर, भाऊसाहेब मिसाळ, सुभाष मिसाळ, बापुसाहेब मिसाळ, रामेश्वर घनकर, श्रीहरी मगर, योगेश बारगळ, सुरज मिसाळ, दादासाहेब घनकर, योगेश गवारे, भगवान बारगळ, तातेराव बारगळ, अंगणवाडी सेविका अनिता शिंदे, उज्वला काळे, उर्मिला गोसावी, ज्योती मगर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री घरटे, श्रीमती पगार, श्रीमती पाटील, श्री राठोड, आदींसह ग्रामपंचायत, सोसायटी सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी




**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी डॉ. संतोष कोकाटे, श्री. दिपक सांगळे, श्री. संदीप नंदन, श्री. पवन रुद्राक्षवार, श्री. विनायक ढोले, श्री. कृष्णा भवर, श्री. योगेश्वर लाड, श्री. हेमंत गायकवाड, श्री. दिलीप राजपूत आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ फेब्रुवारी २०२५


## कन्नड ग्रामीण रुग्णालयात कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन




**कन्नड (अरुण थोरात):** सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण रुग्णालय कन्नड येथे कर्करोग तपासणी व निदान शिबिर दि. १७ फेब्रु २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजे पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.या तपासणी शिबिरात संबंधित तज्ञ डॉक्टर मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशयमुख कर्करोग यांच्या संबंधित तपासणी व रोग निदान करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटनकन्नडच्या लोकप्रिय आमदार संजनाताई जाधव यांच्या शुभहस्ते दि.१७ फेब्रुवारी २०२५ रोजी ग्रामीण रुग्णालय, कन्नड येथे होणार आहे.सर्वांनी या शिबिरात सहभागी व्हावे. वय गट ३०वर्ष व पुढील सर्व महिला व तंबाखू, वीडी, गुटखा, सिगारेट, पान मसाला सेवन करणाऱ्या सर्वांनी आवश्य तपासणी करुण घ्यावे. मोफत आरोग्य सल्ला मिळवण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०४ अधिक माहितीसाठी आरोग्य सेविका आरोग्य कर्मचारी आशा वर्कर यांच्याशी संपर्क साधावा. कन्नड ग्रामीण रुग्णालया मध्ये होत असलेल्या या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आव्हान कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण पवार व सर्व वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय कन्नड यांनी आवाहन केले.

## या पडझडीच्या दिसात



या पडझडीच्या दिसात
वर्तमान उठलाय खायला
इतभर पोटासाठी
रात्र न् दिस राबणाऱ्या हाताला..

भूतकाळाच्या ओझ्याने
वाकले आहेत त्याचे खांदे
डोळ्यांना दिसत आहे
भविष्यातला अंधुक प्रकाश..

वाकलेल्या खांद्यांना
आता पेलवत नाही
भूतकाळ अन् वर्तमानाचं
असह्य जबाबदारीचं ओझं.

तरीही तो ओढतो आहे
गाडं संसाराचं..
पांडुरंग आहे ना तो
त्याच्या लेकुरवाळ्या घराचा म्हणून..

**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.


## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथे इयत्ता दहावीचा निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मदन काका नवपुते, भागिनाथ नवपुते सुनील नाडे, शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे सर, तसेच सर्व सहकारी शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेबी मालोदे यांनी केले, प्रास्ताविक मनीषा शिंदे यांनी केले, तर आभार अर्चना भारद्वाज यांनी केले. दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आवश्यक लिखाणाचे साहित्य पेन पेन्सिल पॅड कंपास बॉक्स इरेझर शॉपनर वाटप करण्यात आले. तसेच स्नेहभोजन देण्यात आले. यासाठी जाहेद खान पठाण यांनी विशेष परिश्रम घेतले. वसंत राठोड, सर्जेराव वाघ , संग्राम सिंग राजपूत, गणेशपठाडे संदीप चव्हाण, तसेच मंगल तारो, अनुजा भिंगोले , सुनिता गनोरीकर, विद्या सासवडे, रवींद्र खापे, सुनिता भोसले मावशी, सुनिता साबळे मावशी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे विशेष नियोजन वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी केले इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत सादर केले मनीषा आंबेकर दीक्षा उबाळे सपना कांबळे यांनी आपले शाळेविषयी मत व्यक्त केले व भविष्यात काय करायचं आहे याविषयी आपले मत मांडले.

## संविधान हेच भारताचे जीपीएस - डॉ. श्रीरंजन आवटे



**कन्नड (प्रतिनिधी)** माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जीपीएस रस्त्याची योग्य दिशा दर्शविण्याचे काम करते तसेच प्रत्येक भारतीयांच्या विकास व भविष्याची दिशा दर्शविण्याचे काम भारताचे संविधान करते असे मत डॉ. श्री रंजन आवटे यांनी शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्ष पूर्ती निमित्त आयोजित संविधान संविधान गौरव महोत्सवात संविधान भान या विषयावर आपले मत व्यक्त करताना प्रतिपादन केले.स्वातंत्र्य समता बंधुत्व व न्याय तसेच समाजवादी समाजरचना, धर्मनिरपेक्षता हे भारतीय संविधानाचे व्याकरण आहे जोपर्यंत ते आपण नीटपणे समजून घेणार नाही तोपर्यंत आपणास संविधानाचा सुयोग्य अर्थ लावता येणार नाही. स्वातंत्र्यासह समानतेचे सहअस्तित्व नसणे हे भारतीय लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे असेही ते म्हणाले तरुणांनी भारतीय संविधानाचा अभ्यास करून त्यातील संविधानिक मूल्यांचा जागर आपल्या गावात केला पाहिजे जेणेकरून प्रत्येक गावात संविधान संस्कृती निर्माण होऊन ती जोपासले जाईल व भारताचा जबाबदार नागरिक निर्माण होण्यास चालना मिळेल. तसेच भारतीय राज्यघटनेतील आपल्या हक्काप्रती आपण जसे जागृत आहोत तसेच कर्तव्याचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव आपल्याला असू द्यावी अशी आवाहन अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. व्ही.एन भोसले यांनी केले.

याप्रसंगी उप प्राचार्य प्रा. अभय आहेर, डॉ. व्ही. डी. मातकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ . बी.के.मगरे, डॉ . अलका गडकरी,डॉ. जगदीश भेलोंडे, डॉ.सुनिल गोरडे, प्रा. हुकुमचंद पवार श्री. अरविंद कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आर . के पवार यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ. के. एल. भानुसे करून दिले तर आभार डॉ. बी.जी.देशमुख यांनी व्यक्त केले व सूत्रसंचालन डॉ. संजय भालेराव केले. याप्रसंगी प्राध्यापक - प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ फेब्रुवारी २०२५

# साधकाची निर्लेप साधना - शुन्यातून प्रेसिडेंट




मराठवाड्यातील जालना जिल्ह्यात जेईएस महाविद्यालयात बी.एस्सी.(केमिस्ट्री) करून १९७२ते ७५मध्ये विद्यापीठात एम.बी.ए.परीक्षेत सर्व तृतीय पारितोषिक प्राप्त करणारे मा.व्यंकटराव दगडूबा काळे प्रेसिडेंट पदापर्यंत जाणाऱ्या साधकांची निर्लेप साधना -'शुन्यातून प्रेसिडेंट'ही सहृदयी आत्मकथन.आत्मविश्वास देणारं आत्मानुभव कथन. ही एक अंगणभर प्राजक्ताच्या फुल्यांनी सडा टाकावा आणि त्याचा सुगंध दर्वळावा.शब्दांनुभावांनी पायघड्या घालाव्यात.रेखावी रांगोळी कित्येक वाचकांच्या मनात असं हे अतिशय गौरवास्पद प्रेसिडेंटली अनुभव कथन.मनमुक्त व्यक्त करण्याची अभिव्यक्ती. सन्माननीय व्यंकटराव काळे साहेब याचे हे उत्तुंग शिखर गाठणारे एक खडतर प्रवास मांडणारे प्रज्ञावंताचे,अभ्यासातून गुणवत्तेची शिदोरी घेऊन सृजनशील दायित्वाने एक सर्वहारा माणूस प्रेसिडेंट या पदापर्यंत पोहचतो.आपल्या सहृदय मनाची नाळ आणि नातं कधीच तुटू देतं नाही म्हणून हे आत्मचरित्रअनुभवाची सच्चिदानंद आनंद देऊन प्रेरणा देते.रा.शि.दोंदे(नाशिक)यांच्या शब्दांकित प्रतिभेला सलाम.कारण इतक्या समर्पक विवेचनातून हा आत्मकथेचा बाज आला आहे.एखाद्या सुंदर फिनिक्स पक्षाने राखेतून उंच भरारी घ्यावी तसे.एका रूपक कथेतून रा.शि.दोंदे सरांनी 'तुज आहे तुजपाशी' या उक्तीचा प्रत्यय देणारी कथा सांगितली आहे.'अरे तू कोण आहेस हे तुला माहीत नाही.तू गरूड आहेसतेंव्हा तू नुसते स्वप्न पाहू नकोस.उठ कष्टाशी मैत्री कर, प्रेम करूणेचा गजर करत स्वप्नांवर स्वार होऊन आभाळाला गवसणी घाल.तो मनाचा पक्षी कष्टावर स्वार होऊन स्वप्नांच्या गळ्यात यशाची माळ घालतो.समाज आणि जनहितासाठी जन्मभर संघर्ष करतो.'ती ही नाभिकांचीयशोगाथा महाराष्ट्राच्या साहित्य मांदियाळीत मैलाचा दगड ठरावी अशीच अतुलनीय आत्मकथा आहे.एका सर्वहारा सामान्य कुटुंबातून असामान्य व्यक्तिमत्व घडविणे,केवळ प्रचंड ज्ञान कष्टाने आपली ध्येय पताका विनयतेने फडकविने. कधीच परिस्थितीला शरण न जाणे.आपल्या उत्तम उत्कृष्ट कामगिरीतून आपला ठसा कायम ठेवून जाणे.म्हणूनच व्यंकटराव काळे यांनी नोकरीत अनेक माणसं कमवली.त्यांचा बायोग्राफ ही त्यांची आयुष्याचीलाख मोलाची शिदोरी आहे.तुमची संपत्ती कुणी विचारीतनाही.तुमची संत्तती किती आहे.या आत्मिक समाधानातलेखकांने आपले मुलं सुना,नातवंडे अतिशय उच्च विभूषित आहे.नोकरी ही एक सत्यनिवेशी चाकरी आहे.या फिरत्या रंगमंचावर खराखुरा अभिनय काळे साहेबांनी करून दाखवला.आणि आपल्या सन्मित्र स्वकर्तृत्वाने उच्चस्तपदावर केवळ आपल्या ज्ञान कौशल्याने गौरवांकित वैभवांने मोठ्या पदाच्या नोकऱ्यात इमाने इतबारे सार्थक्ता करून दाखवली.सतत कार्यमग्नता, कामावर आत्मिक भीष्म नीष्ठता.त्यामुळे अनेकदा उत्कृष्ट कार्य प्रशासक, म्हणून गौरविण्यात आले.तत्कालीन मराठवाडा विद्यापीठात एम.बी.ए. परीक्षेत सर्व तृतीय तरपुढे टेक्स्काम टेक्सटाइल कंपनी मध्ये उत्कृष्ट अधिकारी म्हणून प्रसिद्ध संगीतकार गायक हेमंतकुमार यांच्या शुभहस्ते पुरस्कार.तद्वतच एक सुविद्य पत्नी मिळणे हे भाग्य काळे साहेबांना मिळाले.त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे,बाई म्हणून एका इश्वरी अंशाने.लाखमोलाचा पती हा ऐवज कपाळवर गोंदून सातफेऱ्यात संसारात नांदून दाखवूने.दोन्ही कुळाचा उध्दार करणे.हे संस्कृतीचेमुल्य लक्षण दाखवून लक्ष्मीप्राप्ती केवळ या माय माऊली मुळेव्यंकटराव काळे यांना प्राप्त झाली.त्यांच्या मनाच्या फांदीवर सौ.संगीता व्यंकटराव काळे या अर्धांगिनीला मोरपंखाची साथ मिळाली.या आत्मकथनात भन्नाट अवलिया म्हणून भंणगतेने फिरते दौरे, प्रचंड मिंटिगा,प्रचंड प्रवास,घरी केव्हा येईल याची अनिश्चिती.अशा तंत्रज्ञानी तंगडपल्ली अवस्थेत धर्मपत्नी म्हणून मुलांचे संगोपन करणे.आजच्या काळाचा महिमा क्षणात सांगता येतो. त्या काळात संपर्क माध्यम नव्हती.हा काळाचा इळाजंतरमंतर.याभंयकर परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते.त्यांच्या धर्मापत्नीने त्यांना दिलेली जन्माची साथ तितकीचंसार्थक्तेची आहे.घरची परिस्थिती अत्यंत बिकट,'घर ना दार चावडी बिऱ्हाड'... अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत बारा बलुतेदारांच्या वेतनाची जहांगीर.नाभिक (न्हावी) काखेत धोपटी घेऊन बापाने गावगाडा करत लेकरांना सांभाळले.देवळगाव राजा येथील व्यंकटेश बालाजी देवस्थान हेग्राम देवताचं अधिष्ठान लेखकाने मांडले आहे.म्हणून व्यंकटराव हे नामभिध्दान.चौथी प्रथम क्रमांकाने पास झाल्यावर आपल्या गुरू चरणांचे ऋण घेऊन व्यंकटराव शिक्षणासाठी जालना येथे आले.तत्कालीन शालेय ते महाविद्यालयीन गुरूचां नामोल्लेख करून त्यांची ऋणाईलेखकाने व्यक्त केली आहे.हे या आत्मकथनाचा वेगळा पैलू आहे.कुणाच्या ही नावांची टिका टीपन्नी या कथनात नाही.म्हणून हे अतिशय निर्मळ नितळ निर्लेप साधकाचेभावनिक शिदोरी देणारे आत्मकथन आहे.त्यात शब्दांकन करणारे थोर जेष्ठ लेखक श्रध्देय रा.शि.दोंदे सरांचे मनस्वी श्रेयस त्यांना जाते.व्यंकटराव काळे साहेबांची आत्मसंवादी मुक्त व्यक्त होते.या आत्मकथनात,माझी शाळेची नोंद, चौथीत प्रथम क्रमांक, वडिलांचा आजार, घरं शेकारणे, निजामशाहीचा अंत,कालेज शिक्षण, बहिण अंजनाचे लग्न, वनस्पती शास्त्राची टुर, उच्च शिक्षणाची चाहूल,एम.बी.ए.प्रवेश, पहिल्या नोकरीची संधी, कंपनी कामगारांचा संप,स्थळाच शोध,विक्री दौरा कलकत्ता, मेहता मिल अकोला,औरंगाबादला स्थलांतर, कांकरियांची उत्कृष्ट डाळींब शेती, फळबाग योजनेची सुरुवात,मा.पंतप्रधान चंद्रशेखरजींची भेट, काश्मीर सहल, पश्चिम महाराष्ट्रात बदली, उसावर ठिबक शेती, केंद्रीय कृषिमंत्री बलराम जाखडे भेट,श्री.कोरे जैन इरिगेशनला भेट, आंध्र प्रदेशातील कामगिरी, आदर्श उद्योगपती श्री जैन, प्रेसिडेंट रूंगठा इरिगेशन हैदराबाद अशा पन्नास प्रकरणात या आत्मकथनाची विभागणी आहे.यात घरं संसार आप्त परिवारांचा मागोवा घेताना कंठ दाटून येतो.या प्रतिकूलतेला सलाम करत हे अतिशय उत्तम साहित्य नव्या जगण्याचे प्रयोजन सांगते.ही रंग कथा नाही.तर परिस्थितीला टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या उडविन राई राई एवढ्या...व्यंकटराव काळे, यांच्या जीवन संघर्ष हा चैतन्याचा संदेश देणारा आहे.जालना शहरातील आर.बेझंनजी सायन्स कॉलेज येथे बी.एस्सी.केमिस्टी करतांना श्रध्देय प्रा.सुरेश कुलकर्णी यांच्या घरी लाईट मध्ये अभ्यास करून, सरांच्या घरातील छोटीमोठी कामे करून.शिक्षण घेण्यासाठी, विनयशीलता,चिकित्सक मनोज्ञता,ध्येयाची सीमारेषा कायम मन मस्तिष्कात घोळत ठेवणे. मार्गदर्शकाचे ऋण कायम सहृदयी ठेवणे. या कथनात जालन्याचे प्राचार्य गादीया सरांचा ऋण निर्देश येतो.आपल्या आप्तस्वकीयासहित ज्यांनी अनुभवता दिली.जैन इरिगेशनचे चेअरमन श्री.भवरलाल जैन (भाऊ) नंदकिशोर जी कागलिवाल,अशा साऱ्या संपन्न सन्माननीयांचा ऋण उल्लेख व्यंकटराव काळे करतात.मराठवाड्याच्या भूमीत,शालेय जीवन जगताना बीड जिल्ह्यातील चिंचोली (माळी)या गाव खेड्यातून क्षणा क्षणाचे शिक्षण ही खळाळणाऱ्या दऱ्या सारखी प्रक्रिया आहे.आणि ज्ञान हे ओंजळीत घेतलेल्या पाण्यासारखं आहे.जो क्षणात प्राषण करून बुद्धीच्या बळावर सतत कार्यरत राहिलं त्याचं शिक्षण. शिक्षण हाच उन्नतीचा मूलमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितला तो अंगीकृत करून व्यंकटराव काळे यांनी आपले जगणे समृद्ध केले.साधकांनी साधना साध्य करण्यासाठी साधक्ता सद्वविचारांने साधावी लागते.ध्येयपथावर अविरत प्रयत्न केले की, शिखर काबीज केल्या जाते.मिळालेलं यश केव्हा स्वप्नवत होते कळत नाही.बापाची मेहनत,तत्कालीन गावगाडा, पोट,कोरभर भाकर, अंगभर कपडा, एवढीच बापाची धडपड. जातपात, जातीच्या उतर पायऱ्या.उतळणी ,जातीची खापरंखुटी, या सगळ्या गोष्टींचा उलगडा या कथनातून झाला आहे.बहिण मेव्हण्याच्या आधारांने जालन्यात कालेज शिक्षण.परिस्थितीने शिक्षणाची मेख कच्चखाप्पी कंबर कसून व्यंकटराव काळे यांनी नोकरीतले उच्चस्थपद केवळ आपल्या (स्कील) ज्ञान साधनेने प्राप्त केले. त्यातअंगीकृत संघटन कौशल्य, साधनेतील विनयशीलता चिकित्सक मनोज्ञता ध्येयाची सीमारेषा कायम ठेवूनआपल्या कर्तव्यदक्षतेला महत्त्व दिले.सत्कर्म कधीच वाया जात नाही.म्हणून सत्कार्य करण्याचा मूलाधार या गुणांचा परिपोष या आत्मकथनात आहे.बापाने मुलीच्या स्वप्नांतला राजकुमार पहावा.तीने फक्त सुखाचा राजा राणीचा संसार करावा.मुलांने आपल्या मायबापाचे नावं काढावे. महाराष्ट्राच्या मराठी साहित्यआत्मकथनांच्या परिप्रेक्ष्यातून एका सृजन नाभिकांची उच्च विभूषित संविधान उद्देशिका सांगणारी ही सविनय आत्मकथा आहे.

**पुस्तक परिचय - डॉ प्रभाकर शेळके,**
जालना

शुन्यातून प्रेसिडेंट
व्यंकटराव दगडूबा मुळे
प्रकाशक - वैशाली प्रकाशन, पुणे
प्रथमावृती - नोव्हेंबर २०२४
किंमत - ३५०पृष्ट २८०
मधुरध्वनी:-8208405875

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ फेब्रुवारी २०२५

# ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन : ठाले पाटलांनी राज्यकर्त्यांना ठोकून काढले

















**छत्रपती संभाजीनगर :** येथील विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख महाविद्यालय आणि मराठवाडा साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४४ वे मराठवाडा साहित्य संमेलनाचे उद्घाटन दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणात 'विलासराव देशमुख साहित्य नगरी' येथे राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संमेलनाध्यक्ष डॉ. भीमराव वाघचौरे, आशाताई वाघचौरे, मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. जगदीश कदम, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह डॉ. दादा गोरे, उपाध्यक्ष रामचंद्र तिरूके, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, डॉ. दिपा क्षिरसागर, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. ऋषीकेश कांबळे, उद्योजक आणि मसिआचे अध्यक्ष चेतन राऊत, आंतरराष्ट्रीय वन्यजीव छायाचित्रकार बैजू पाटील, संयोजक प्राचार्य विलास राऊत, विवेक जैस्वाल, देविदास फुलारी, हेमलता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांकडून महामानवांना अभिवादन करण्यात आले आणि दिवंगत साहित्यिक न्या. नरेंद्र चपळगांवकर व प्राचार्य रा. रं. बोराडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. रंगलाल बाहेती अंध मुलींच्या कार्यशाळेतील विद्यार्थीनींनी स्वागत गीताने स्वागत केले. दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल हजारे यांनी प्रास्ताविक केले तर विजय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आणि साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्ष विजय राऊत यांनी स्वागतपर मनोगतात मराठवाड्याच्या साहित्य परंपरेचा आणि आपल्या संस्थेचा गौरवशाली इतिहास मांडला.

संस्थेच्या वतीने सचिव विजय राऊत, शिवानी राऊत, प्राचार्य डॉ. राहुल हजारे, अनिल पाटील, मनिष जैस्वाल, डॉ. युवराज धबडगे, डॉ. संजय सांभाळकर, रमा उबाळे, वैशाली अवघडे, प्रा. भरतसिंग सलामपुरे, वंदना पेडसे, कवी गणेश घुले, विद्या उगले, नुतन अडसरे, धनश्री कांबळे, अनुजा कंदी, यांनी मंचावर उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ढाले पाटील यांनी आपल्या भाषणात राज्यकर्त्यांचे चांगलेच वाभाडे काढले. नियोजित उद्घाटक मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सावंत यांची अनुपस्थिती व पालकमंत्री संजय सिरसाठ यांच्या उशीरा येण्यावरून आमचे नेते अप्रामाणिक असून जनतेशी बांधील नाहीत, स्वार्थासाठी बांधील आहेत. अशी जहरी टिका केली. अभिजात भाषेचा दर्जा देणारे हे कोण? असा प्रश्न केंद्र शासनाला विचारत ज्या दिवशी ज्ञानेश्वरी लिहली गेली, त्याच दिवशी मराठी भाषा अभिजात झाली. हे सरकार दुटप्पी आहे. ३०० कोटी मिळतात हा भ्रम आहे. फक्त सरकारची प्रीय आणि मृत झालेल्या संस्कृत भाषेला भरगोस नीधी दिला जातो. इतर भाषांना नाही असे स्पष्ट करून मराठी वाङमय लेखनाचा इतिहास हा मराठवाड्याचा आहे असे ठासून सांगितले. उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे यांनी केले.